ISSN 2394-5303

# प्रींटींग एरिया®

Issue-92, Vol-03, August 2022

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
International Multilingual Research Journal

CamScanner

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

August 2022, Issue-92, Vol-03

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Printing Area

www.विद्यावार्ता.कॉम

YouTube Channel


*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***


Indexed

IMPACT 8.012 iijif FACTOR

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002

Harshwardhan Publication Pvt.Ltd. • ISO9001-2015 CERTIFIED • International Multilingual Research Journal •

http://www.printingarea.blogspot.com

# Editorial Board & review Committee

**Chief Editor**
**Dr Gholap Bapu Ganpat**
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

**M.Saleem**
saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

**Dr. Momin Mujtaba**
Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

**N.Nagendrakumar**
115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

**Dr. Vikas Sudam Padalkar**
vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

**Dr. Wankhede Umakant**
Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

**Dr. Basantani Vinita**
B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

**Dr. Bharat Upadhya**
Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

**Jubraj Khamari**
AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

**MISS. VARSHA ANILRAO TIDKE**
FULE-AMBEDKAR COLLEGE OF SOCIAL WORK,
HANUMAN NAGAR, REVENUE COLONY, GADCHIROLI
9421857700
varshaatidke21@gmail.com

**Dr Trushna S Kalambe**
66 Ayodhyanagar behind
sai Mandir lane no 2 Nagpur-440024

**Dr. Ambhore Shankar**
Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

**Dr. Sumit Prasad**
Professor Colony, Kankarbagh,
PO – Lohia Nagar,Patna – 800 020 (Bihar)
prasadsumit78@gmail.com

**Prof. Surwade Yogesh p**
Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

**Dr.Deepak Vishwasrao Patil,**
At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

**Dr.Vidhya.M.Patwari**
Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
patwarivm@rediffmail.com

**Dr. Varma Anju**
Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

**Dr. Dinesh Kumar Charan**
Associate Professor and HOD-History Dept.,
Govt.Lohia College Churu (Rajasthan) India
Pin- 331001
**Mob. No.-9414305804**

14) संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिकता
प्रा.डॉ. कल्याण गोपनर, परभणी ||67

15) आधुनिक भारतातील पहिला महात्मा – जोतीबा फुले
श्री. सतीश ज. पिसे, जि. चंद्रपूर ||70

16) स्त्रियांची आध्यात्मिक शक्ती वाढविणारे हरतालिका व्रत
प्रा.डॉ. विजय रेवजे, सोलापूर ||72

17) वारकरी संप्रदाय स्वरूप आणि वाटचाल
शुभांगी भाऊसाहेब शेलार & प्रा. डॉ. शशिकांत पाटील, जि. जालना ||74

18) लोकसंख्या वाढ आणि पर्यावरण
प्रा. डॉ. टी.जी. सिराळ, जि. हिंगोली ||78

19) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता
शितल तुकाराम सोनवणे, भुसावळ ||80

20) इंद्राई किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा
प्रा.डॉ. जाधव नितीन साहेबराव, जि. नाशिक ||84

21) जीवन समाधान और आशावादी – निराशावादी अभिवृत्ती
प्रा.डॉ. व्ही एन रामटेके, ऐनपूर ||88

22) पर्यावरण अन्तर्राष्ट्रीय चुनौती एवं विश्लेषण
डॉ० रंजु कुमारी, राँची– (झारखंड) ||91

23) मेरठ जिले की विवाहित एवं अविवाहित बी०एड० छात्राओं के आत्म–प्रत्यय ...
डा०शरद कुमार अग्रवाल, मेरठ ||97

24) भारतीय दर्शन तथा धर्म की अवधारणा एक अनुशीलन
डॉ. भावना कुमारी, रांची झारखंड ||101

25) भारतीय संगीत के वैश्विक प्रसार में महिला कलाकारों का योगदान
अर्पिता चौधरी & डॉ. विशाल जैन, प्रयागराज ||109

26) ममता कालिया के 'बेघर' उपन्यास में चित्रित नारी कौमार्य का मिथक
डॉ. रत्नमाला धारबा धुळे, वसमत ||112


www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

**20**

# इंद्राई किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा

**प्रा.डॉ. जाधव नितीन साहेबराव**
(एम.ए. सेट. नेट.एम.फिल्. पीएच. डी.),
ता. चांदवड, जि. नाशिक

***********

**इंद्राई किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा**

**प्रास्ताविक:-**

सातमाळ डोंगररांगेतील विस्ताराने मोठ्या असलेल्या किल्ल्यांपैकी एक किल्ला म्हणजे इंद्राई किल्ला होय. अवाढव्य आकाराबरोबरच कातळातील कोरीव स्थापत्य अवशेषांसाठीही इंद्राई किल्ला प्रसिद्ध आहे. इंद्राई किल्ल्याचे वैशिष्ट्ये म्हणजे या किल्ल्याच्या उभारणीत बांधकाम कमी व कातळ कोरणे, कातळ खोदणे व कातळ तासणे याचाच अवलंब अधिक झालेला दिसून येतो. सतराव्या शतकात इंद्राई किल्ला अहमदनगरच्या निजामशाहीच्या वर्चस्वाखाली असताना या किल्ल्याचा किल्लेदार गंभीरराव याने न लढताच हा किल्ला मोगल सेनापती अलवर्दीखान याच्या हवाली केला. न लढताच शरणागती पत्करणे हा या बुलंद किल्ल्यावरील एक कलंकच म्हणावा लागेल. कारण कुठल्याही शत्रूला हा किल्ला सहजासहजी जिंकणे शक्य नव्हते. असे असले तरी यामुळे इंद्राई किल्ल्याचे महत्त्व कमी होत नाही. एकूणच मध्ययुगीन कालखंडातील एक वैभवशाली किल्ला म्हणून इंद्राई किल्ल्याचे स्थान अबाधित आहे. असा हा बुलंद किल्ला इंद्रगिरी, इंद्रायनी व इंद्रगड या नावांनीही ओळखला जातो.

इंद्राई किल्ला सातमाळ डोंगररांगेतील पूर्व टोकाला उत्तर अक्षांश २०.३५ ते पश्चिम रेखांश ७४.२० वर स्थित आहे. हा किल्ला गिरिदुर्ग प्रकारातील किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १३७० मीटर (४४९४ फुट) इतकी आहे.१इंद्राई किल्ल्याचे सर्व बाजूंचे कडे तीव्र उताराच्या असल्याने या किल्ल्याला बांधीव तटबंधीची फारसी आवश्यकता नव्हती.

इंद्राई किल्ल्याची निर्मिती कोणत्या राजवटीच्या काळात व कधी झाली याबद्दल निश्चित माहिती उपबल्ध नाही. असे असले तरी इंद्राईशेजारील चांदवड या ठिकाणी इसवी सनाच्या अकराव्या शतकात यादवांची राजधानी होती, हा संदर्भ लक्षात घेता या किल्ल्याची निर्मिती यादवकाळात झाली असल्याचा निश्चित तर्क काढता येतो. असे असले तरी इंद्राई किल्ल्यावरील लेणी वजा गुहांची रचना राष्ट्रकूटकालीन स्थापत्य रचनेशी साम्य दर्शविणारी आहे. त्यामुळे या किल्ल्याची निर्मिती राष्ट्रकूट काळात झाली असण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. एवढे मात्र निश्चित की या किल्ल्याची निर्मिती बहामनी कालखंडाच्या अगोदर झालेली होती. कारण मुस्लिम स्थापत्याशी साधर्म्य असलेले कुठलेही स्थापत्य अवशेष या किल्ल्यावर दिसून येत नाहीत. एकूणच इंद्राई किल्ल्याची निर्मिती प्राचीन काळात झाली असण्याचा तर्कवजा निष्कर्ष काढता येतो.

इंद्राई किल्ल्यावर मोठ्या संख्येने ऐतिहासिक अवशेष असून त्यामध्ये गुहा, मंदिर, खोदीव तलाव, पाण्याचे टाके व खोदीव पायऱ्या यांचा विशेष भरणा आहे. यापैकी बऱ्याच अवशेषांची दुरवस्था झालेली आहे. किल्ल्याच्या माचीवजा पठारावर उघड्यावरील हनुमानाची मूर्ती तसेच काही उद्ध्वस्त इमारतींचे अवशेष दिसून येतात. किल्ल्याच्या उत्तर बाजूच्या कड्याला म्हणजे ज्या ठिकाणाहून इंद्राई किल्ल्याचा बालेकिल्ला सुरू होतो, त्याठिकाणी काताळात खोदलेली गुहा तसेच पाण्याची टाके आहेत. या ठिकाणाहून बालेकिल्ल्यावर प्रवेश करण्यासाठे दोन्ही बाजूचा कातळ तासून तयार केलेला खोदीव पायऱ्यांचा मार्ग आहे. या तासीव काताळात छोट्या गुहा असून वरच्या टोकाजवळ चार फुट उंचीचा व नऊ ओळींचा फारसी शिलालेख असून या शिलालेखात मोगल सेनापती अल्लहवर्दीखान याने अहमदनगरच्या निजामशाहीकडून सातमाळ डोंगररांगेतील इंद्राईसह जिंकलेल्या किल्ल्यांचा उल्लेख आहे.

इंद्राईच्या बालेकिल्ल्यावर पश्चिम बाजूच्या कातळकड्याला धान्य साठविण्यासाठी अथवा दारूगोळा साठविण्यासाठे खोदलेल्या गुहा असून शेजारी पाण्याची टाकी व कातकाळ खोदलेल्या पायऱ्या आहेत. याचप्रमाणे किल्ल्याच्या पूर्व बाजूला कातकाळ खोदलेल्या गुहा असून या गुहा लेणी असाव्यात असे त्यांच्या आकारावरून वाटते. या सर्व गुहांना नक्षीदार खांब असून काही खांब तर अष्टकोनी आहेत. प्रत्येक गुहेला प्रवेशद्वार असून काही गुहा आतून एकमेकांना जोडलेल्या आहेत. या गुहांच्या शेजारी खोदीव पाण्याचे टाके तसेच जवळच कातळात खोदलेले नऊ इंच व्यासाचे व गोल आकाराचे ७२ छिद्र एका सरळ ओळीत असून या छिद्रांचे प्रयोजन काय? हे मात्र समजत नाही. मध्ययुगीन काळात कातळ फोडण्यासाठी अशा प्रकारची छिद्रे कोरून त्यात स्फोटाची दारू भरली जात असे. या ठिकाणीही कातळात खोदलेल्या पायऱ्या दिसून येतात. जवळच पाण्याचे दोन खोदीव तलाव असून यापैकी एका तलावाचे खोदकाम इ.स. १७७० मध्ये झाले आहे. वरील अवशेषांशिवाय इंद्राईच्या

बालेकिल्ल्यावर पाण्याची टाके, महादेव मंदिर, पिराचे स्थान, उद्ध्वस्तइमारतींचे अवशेष व उत्तर टोकाला बुरुजाचे अवशेष दिसून येतात. याचबरोबर दक्षिण टोकाच्या कातळकड्याला ५२ खोदीव पायऱ्या असून या पायऱ्यांनी दक्षिण बाजूने इंद्राई किल्ल्याच्या बालेकिल्ल्यावर चढाई करता येते. एकूणच आपल्या आकाराप्रमाणेच स्थापत्य अवशेषांनीही इंद्राई किल्ला समृद्ध आहे.२

**इंद्राई किल्ल्यावरील शिलालेख :-**

इंद्राई किल्ल्याच्या खोदीव प्रवेशमार्गाच्या दक्षिण बाजूच्या कातळकड्यावर मोगलकालीन शिलालेख आहे. प्रस्तुत शिलालेख उठावाच्या प्रकारचा असून या शिलालेखाची लिपी व भाषा फारसी आहे. सदर शिलालेख नऊ ओळींचा असून शिलालेखाची उंची चार फूट व रुंदी दोन फूट चार इंच इतकी तर शिलालेखातील अक्षरे तीन इंच उंचीची आहेत. सध्य:स्थितीला शिलालेख मोठ्या प्रमाणावर झिजलेला असून त्यावरील अक्षरे अस्पष्ट झालेली आहेत.या शिलालेखात मोगल सेनापती अलवर्दीखान याने इसवी सन १६३६ मध्ये सातमाळ डोंगररांगेतील किल्ले अहमदनगरच्या निजामशाहीकडून जिंकल्याचा उल्लेख आहे. सदर शिलालेखावरील ओळी पुढीलप्रमाणे आहेत.

१) हिजरी १०४५ च्या शव्वाल महिन्याच्या सोळाव्या दिवशी म्हणजेच पाचव्या दिवशी

२) इलाही ९ व्या वर्षी फरवदीन महिन्याच्या मेहरबानी आणि

३) प्रेषित मुहंमद व त्यांचे वंशज यांच्या छयेखाली शैबुद्दीन-दिन-मुहंमद

४) दुसरा शहाजहान बादशहाचा यांच्या छायेच्या भाग्यामुळे नम्र

५) सेवक (गुलाम) अलावर्दीखान तुर्कमान याने हा किल्ला इंद्राई इतर किल्ल्यांसह जिंकला.

६) दोन महिन्यांमध्ये (जिंकलेल्या किल्ल्यांची) नावे

७) चांदोर किल्ला (चांदवड) राजदेर किल्ला

८) कोल्हेर (कोल्हधेर) किल्ला, कांचना किल्ला आणि मांचना किल्ला, रहुला किल्ला आणि जऊला किल्ला, (रवळा-जवळा किल्ला) मार्कंडेय किल्ला

९) कांचना किल्ला, अहिवंत किल्ला, अचलगड किल्ला आणि रामसेज किल्ला.३

**इंद्राई किल्ल्याचा शिवपूर्वकालीन कालखंडाचा ऐतिहासिक आढावा:-**

इंद्राई किल्ल्यावर प्राचीन काळी राष्ट्रकूट व त्यानंतर यादव सत्तेचे वर्चस्व असावे. परंतु या राजवटींच्या काळातील ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाही. दरम्यान इसवी सन १३४७ मध्ये दक्षिणेत बहामनी सत्तेचा उदय झाला. याचबरोबर इंद्राई किल्ला व सातमाळ डोंगररांगेचा परिसर या सत्तेच्या वर्चस्वाखाली आला. पुढे पंधराव्या शतकाच्या अखेरीस बहामनी सत्तेचे विघटन होऊ पाच स्वतंत्र राजवटी उदयास आल्या. यापैकी अहमदनगरची निजामशाही एक प्रमुख सत्ता होती. सातमाळ डोंगररांगेचा परिसर याच निजामशाहीच्या वर्चस्वाखाली असल्याने सोळाव्या शतकात इंद्राई किल्ल्यावर अहमदनगरच्या निजामशाहीचे वर्चस्व कायम राहिले.

इसवी सन १६३० च्या सुमारास मोगल बादशहा शहाजहान याने अहमदनगरची निजामशाही सत्ता जिंकून घेण्यासाठी प्रचंड मोहीम काढली.याकाळात निजामशाहीच्या रक्षणासाठी या सत्तेचे प्रमुख सरदार शहाजीराजे भोसले यांनी मोगलांविरुद्ध तीव्र लढा दिला. परंतु मोगलांची लष्करी शक्ती प्रचंड असल्यामुळे शहाजी राजे निजामशाहीचे अस्तित्व कायम राखण्यात अपयशी ठरले. दरम्यान मोगल सेनापती शयिस्तेखान याच्या फौजेतील प्रमुख सरदार अलवर्दीखान याने इसवी सन १६३६ मध्ये सातमाळ डोंगररांगेतील किल्ले जिंकण्यासाठी तीव्र आक्रमण केले. अलवर्दीखान याने सर्वप्रथम चांदवडचा किल्ला जिंकला.यानंतर त्याने इंद्राई किल्ल्याकडे मोर्चा वळविला.इंद्राई किल्ल्याचा तत्कालीन किल्लेदार गंभीरराव हा मूळचा सप्तश्रृंगी गडाजवळील चंडिकापूर गावचा रहिवासी होता. शहाजी राजे भोसले यांचा चरित्रकार जयराम पिंडे हा गंभीररावाचा मुलगा होता. मोगलांची प्रचंड लष्करी शक्ती तसेच दरम्यानच्या काळात निजामशाही सत्तेचा सर्वत्र झालेला पराभव या परिस्थितीचा विचार करून गंभीरराव याने अलवर्दीखान याची भेट घेतली व अभय मागितले. त्यानुसार अलवर्दीखानाने इंद्राई किल्ल्यावरील सर्व शिबंदीला अभय दिले. यानंतर लगेचच १७ मार्च १६३६ रोजी गंभीरराव याने इंद्राई किल्ला अलवर्दीखान याच्या स्वाधीन केला.यावेळी गंभीरराव याने मोगलांची चाकरी पत्करली.अलवर्दीखानाने गंभीरराव याला दोन हजार जात (पायदळ) व एक हजार स्वार (घोडदळ) अशी मनसब बहाल केली. याशिवाय अलवर्दीखान याने गंभीरराव याला सरकारी खजिन्यातून पन्नास हजार रुपये रोख बक्षीस दिले. सातमाळ डोंगररांगेतील उर्वरित किल्ल्यांच्या किल्लेदारांनीही गंभीरराव याच्याप्रमाणे आपापल्या ताब्यातील किल्ले मोगलांच्या स्वाधीन करावेत म्हणून अलवर्दीखान याने गंभीरराव याला अभय देऊन मनसब व रोख बक्षीस दिले होते. तसेच गंभीरराव हा सातमाळ डोंगररांगेतील इतर किल्ले जिंकून देण्यास अलवर्दीखान याला सहाय्य करणार होता.४ अशा प्रकारे इंद्राई किल्ल्यावर अहमदनगरच्या निजामशाहीचे दीडशे वर्षांपासून असलेले वर्चस्व

संपुष्टात आले. यानंतर जवळपास एक शतक हा किल्ला मोगलांच्याच वर्चस्वाखाली राहिला.

**इंद्राई किल्ल्याचा शिवकालीन कालखंडाचा ऐतिहासिक आढावा:-**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी इसवी सन १६७० च्या अखेरीस सातमाळ डोंगररांगेच्या पश्चिम भागातील हातगड, अचला, अहिवंतगड, मार्कंडेय, रवळा-जवळा तसेच कांचना हे किल्ले मोगलांकडून जिंकून घेतले होते. परंतु इंद्राई किल्ला मात्र शिवकाळात मोगलांच्याच वर्चस्वाखाली राहिला. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा या किल्ल्याशी विशेष संबंध आला नाही. तसेच या कालखंडात इंद्राई किल्ल्यावर विशेष अशा राजकीय घटना घडलेल्या दिसून येत नाहीत. या काळातील फक्त काही प्रशासकीय उल्लेख मिळतात. इसवी सन १६९० च्या सुमारास इनायतुल्ला हा इंद्राई किल्ल्याचा किल्लेदार मृत्यू पावला असता त्याच्या जागी त्याचा मुलगा फजलुल्ला याची नेमणूक करण्यात आली. तसेच इनायतुल्ला याचा दुसरा मुलगा मुरादअली याची मनसब वाढविण्यात आली.५एकूणच मोगल कालखंडात इंद्राई किल्ल्यावर राजकीयदृष्ट्या विशेष घडामोडी घडलेल्या दिसून येत नाहीत.

**इंद्राई किल्ल्याचा पेशवेकालीन कालखंडाचा ऐतिहासिक आढावा:-**

इसवी सन १७२३ पर्यंत इंद्राई किल्ल्यावर मोगलांचे वर्चस्व कायम होते. दरम्यान इसवी सन १७२३ मध्ये हा किल्ला हैद्राबादच्या निजामशाहीच्या वर्चस्वाखाली गेला.पुढे इसवी सन १७५२ मध्ये पेशवा बाळाजी बाजीराव याच्या काळात मराठे व निजाम यांच्यात भालकी येथे युद्ध होऊन निजामचा पराभव झाला.यावेळी मराठे व निजाम यांच्यात भालकी येथे तह होऊन नाशिक व बागलाणचा प्रदेश मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आला.याच भालकीच्या तहानुसार इंद्राई व सातमाळ डोंगररांगेतील इतर सर्व किल्ले मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आले.६ दरम्यान इसवी सन १७५३-५४ सुमारास पेशवा बाळाजी बाजीराव व हैद्राबादचा निजाम सलाबतजंग यांच्यात तह होऊन मराठ्यांनी सातमाळ डोंगररांगेच्या पश्चिम भागातील बहुतांश किल्ले निजामाला परत दिले. यामध्ये इंद्राई किल्ल्याचाही समावेश होता.७अशाप्रकारे सातमाळ डोंगररांगेतील बहुतेक किल्ले पुन्हा हैद्राबादच्या निजामाच्या वर्चस्वाखाली गेले. पुढील काळात इसवी सन १७५७ मध्ये हैद्राबादचा निजाम व पेशवा बाळाजी बाजीराव यांच्यात करार होऊन इंद्राईसह सातमाळ डोंगररांगेतील चांदवडच्या पश्चिम भागातील सर्व किल्ले मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आले.८

इसवी सन १७६३ च्या सुमारास हैद्राबादच्या निजामने मराठा राज्यावर स्वारी केली व पुणे येथे जाळपोळ तसेच लुटालूट केली. नाशिक व खानदेश भागातही निजामाच्या आक्रमणाची भीती निर्माण झाली होती. यावेळी आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून खबरदारीचा उपाय म्हणून इंद्राई किल्ल्यावर अन्नधान्य, तेल, तूप व इतर जीवनावश्यक वस्तूंचा अतिरिक्त साठा करण्यात आला. दरम्यान चांदवड किल्ल्यावर पाण्याची टंचाई असल्यामुळे तेथील काही शिबंदी पावसाळा सुरू होईपर्यंतइंद्राई किल्ल्यावर हलविण्यात आली होती.९ एकूणच चांदवड किल्ल्यावर पाण्याची कमतरता असताना इंद्राई किल्ल्यावर असलेल्या पाण्याच्या तलावात तसेच टाक्यांमध्ये बऱ्यापैकी पाणी असावे. इसवी सन १७६५ च्या अखेरीस पेशवा थोरला माधवराव यांचे चुलते रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा उत्तरेच्या स्वारीवर निघाले असता, नोव्हेंबर इसवी सन १७६५ मध्ये त्यांनी इंद्राई किल्ल्यास भेट देऊन किल्ल्यावरील व्यवस्थेची पाहणी केली होती. याबाबतचे पत्र यशवंतराव गंगाधर मुतालिक याने पेशवा थोरला माधवराव यास पाठविले होते.१० पुढील काळात इसवी सन १७७० मध्ये इंद्राई किल्ल्यावर तलाव खोदण्याच्या कामासाठी प्रतिवर्ष ९९६ रुपयांची तरतूद करण्यात आली. परंतु किल्ल्यावर कायमस्वरूपी कारखानीस अधिकारी नसल्याने तळ्याचे काम व्यवस्थित होणार नाही, अशी शंका व्यक्त करण्यात आली. तसेच कारखानीस नेमण्याच्या दृष्टीने कारवाई करण्याचे ठरले. वरील खर्च पेशवा थोरला माधवराव याचा चुलता रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा हे आनंदवली येथे असताना त्यांच्याकडील उत्पन्नातून केला जाणार होता.११वरील पत्रावरून असे लक्षात येते की, इंद्राई किल्ल्यावर असलेल्या खोदीव तळ्याची निर्मिती पेशवेकाळात इसवी सन १७७० च्या सुमारास झाली.

**इंद्राई किल्ल्याचा ब्रिटिशकालीन कालखंडाचा ऐतिहासिक आढावा:-**

इसवी सन १८१८ च्या सुरुवातीला ब्रिटिशांनी पेशवा दुसरा बाजीराव याचा निर्णायक पराभव करून मराठा सत्तेचा अस्त केला. मराठा राज्य जिंकल्यानंतर इंग्रजांनी मराठ्यांचे किल्ले जिंकण्यावर लक्ष केंद्रित केले. त्यानुसार नाशिक व बागलाण भागातील किल्ले जिंकण्याची जबाबदारी कर्नल मॅकडोवेल व कॅप्टन जॉन ब्रिग्ज या लष्करी अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली होती.

१३ एप्रिल इसवी सन १८१८ रोजी इंग्रज सैन्याने इंद्राई किल्ल्यावर तोफांचा मारा सुरू केला.याअगोदर एक दिवस म्हणजे १२ एप्रिल १८१८ रोजी इंद्राई किल्ल्याशेजारील राजदेर किल्ला इंग्रज लष्कराने रात्री तोफांचा मारा करून हस्तगत केला होता.तसेच याअगोदरच मराठा सत्तेचा अस्तही झालेला असल्याने इंद्राई किल्ल्यावरील शिबंदीने विशेष प्रतिकार न करता किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन केला.१२

दरम्यान कॅप्टन जॉन ब्रिग्ज याने इंद्राई किल्ल्याची पुर्नस्थापना

म्हणजेच किल्ल्यावर इंग्रज अधिकारी व सैन्याची नेमणूक करण्याबाबत मुंबई प्रांताचा गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याला पत्र पाठविले.१३इंद्राई किल्ल्यावरील मराठा शिबंदीने किल्ला सोडतांना किल्ल्यावरील पाण्याचे स्त्रोत व धान्याची कोठारे यांची नासाडी केली होती. तेव्हा इंद्राई किल्ल्यावरील वरील घटकांची दुरुस्ती करण्याचा निर्णय इंग्रजांच्या लष्करी अधिकाऱ्यांनी घेतला.१४ सातमाळ डोंगररांगेतील राजदेर, इंद्राई व इतर काही किल्ले जिंकताना इंग्रजांना या किल्ल्यांवरील काही सैनिकांनी व अधिकाऱ्यांनी मदत केली होती. या सैनिकांना व अधिकाऱ्यांना इंग्रज प्रशासनाने विशिष्ट रक्कम बक्षीस म्हणून दिली. यामध्ये गोपालराव राजा हा प्रमुख अधिकारी होता.१५सातमाळ डोंगररांगेतीलकिल्ल्यांवरील सैनिकांनी इंग्रजांचे प्रलोभन स्वीकारल्यामुळेच इंद्राई व इतर बुलंद किल्ले एक-एका दिवसात काबीज करण्यात इंग्रजांना यश आले होते. याठिकाणी इंग्रजांकडून विशेष बक्षीस मिळालेला गोपालराव राजा कोणत्या किल्ल्याचा किल्लेदार होता. याबाबतची माहिती मिळत नाही.

दरम्यान,इंद्राई किल्ल्यावरील धान्याच्या साठ्यांची तसेच इतर सामग्रीची पावसामुळे व इतर कारणांमुळे नासाडी होऊ नये म्हणून इंग्रज अधिकाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश वरिष्ठ स्तरावरून देण्यात आले.१६वरील निर्देशानुसार इंद्राई व सभोवतालच्या इतर किल्ल्यांच्या दुरुतीसाठी एक अधिकारी नेमण्यात आला. तसेच इंद्राई किल्ल्यावर आवश्यक सैन्याची तरतूद करण्यात आली.१७ दरम्यान मराठ्यांच्या काही बंडखोर टोळ्यांनी या किल्ल्याचा आश्रय घेऊन इंग्रज सत्तेविरोधात उठाव करू नये म्हणून लेफ्टनंट कॉवेन्ट्री याने इंद्राई किल्ल्याचे प्रवेशमार्ग व इतर अवशेष नष्ट करण्याचा निर्णय घेतला.१८ सातमाळ डोंगररांगेतील किल्ले नष्ट करण्यासाठी १३३० रुपये खर्च अपेक्षित असल्याचे कॅप्टन जॉन ब्रिग्ज याने अहमदनगरच्या कलेक्टरला कळविले. याचबरोबर लेफ्टनंट मॅकिन्टॉश याच्याकडे चांदवड, राजदेर, इंद्राई व सभोवतालचे इतर किल्ले नष्ट करण्याची जबाबदारी सोपविली. यासाठी मजूर, कारागिर व अवजारे उपलब्ध होण्यास थोडा उशीर लागेल असेही कळविले. तसेच वरील सर्व किल्ले नष्ट करण्याअगोदर त्यांचे सर्वेक्षण करावे असेही सांगण्यात आले. तसेच किल्ल्यांवरील गुहा व कोठारे नष्ट करू नयेत, यासाठीही धोरण ठरविण्यात आले.१९

किल्ले नष्ट करण्याच्या धोरणानुसार लेफ्टनंट मॅकिन्टॉश याने पुढील चार महिन्यांत म्हणजेच १० जुलै इसवी सन १८१९ पर्यंत इंद्राई किल्ल्यावरील अनेक अवशेष नष्ट केले. तसेच त्याबाबतचा अहवाल मुंबई येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविला.२० असे असले तरी राजदेर किल्ल्याप्रमाणे इंद्राईचा प्रवेश मार्ग नष्ट करण्यात आला नाही. इंद्राईचा कातळकड्यातील खोदीव प्रवेशमार्ग इतका भक्कम आहे की तो नष्ट करणे फार कठीण काम होते.दक्षिण बाजूचा प्रवेशमार्ग मात्र काही प्रमाणात नष्ट केलेला दिसून येतो. असे असले तरी इंग्रजांच्या किल्ले नष्ट करण्याच्या धोरणाचा इंद्राई किल्ल्यावर विशेष परिणाम झालेला दिसून येत नाही.

**मूल्यमापनः-**

मध्ययुगीन कालखंडात सातमाळ डोंगररांगेतील अनेक किल्ल्यांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या राजकीय घटना घडलेल्या दिसून येतात. यामध्ये इंद्राई किल्ल्याचाही समावेश आहे.परंतु इंद्राई किल्ला काही बाबतीत दुर्दैवीही ठरला.विशेषता इसवी सन १६३६ मध्ये इंद्राईचा निजामशाही किल्लेदार गंभीरराव याने विनाप्रतिकार हा किल्ला मोगलांच्या स्वाधीन केला.अशाच प्रकारे इसवी सन १८१८ मध्येही इंद्राई किल्ल्यावरील मराठा शिबंदीने न लढताच हा किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन केला.एकूणच इंद्राईसारखा बुलंद किल्ला कित्येक महिने शत्रूशी लढू शकत होता.तसेच शत्रूला आल्या पावली परतही पाठवू शकत होता. परंतु या किल्ल्याच्या त्या-त्या वेळेच्या किल्लेदारांनी वैयक्तिक स्वार्थ तसेच तत्कालीन परिस्थितीचा विचार करून शरणागती पत्करली होती.इसवी सन १६३६ मध्ये निजामशाहीचा अंत झाला असल्याने मोगलांशी झुंझ देणे व्यावहारिक नसल्याने गंभीरराव या इंद्राईच्या किल्लेदाराने मोगल सरदार अलवर्दीखान याच्यापुढे शरणागती पत्करली. याचप्रकारे १८१८ मध्ये मराठा सत्तेचा अस्त झालेला असल्यामुळे तत्कालीन मराठा शिबंदीने इंग्रजांना प्रतिकार केला नाही.

**संदर्भ सूची:**


१) कुलकर्णी, के. के., संपादक, नाशिक जिल्हा गॅझेटिअर, गव्हर्मेंट सेन्ट्रल प्रेस, मुंबई, १९९४, पृ. ४४५

२) जाधव, एन. एस.,इंद्राई किल्ला भेट, दिनांक १६/०८/२०१५

३) बोरोले, अमित, दुर्गभ्रमंती नाशिकची, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०११, पृ. ४२५

४) पगडी, सेतु माधवराव, शिवचरित्र एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, १९७१, पृ. १७९

५) पगडी, सेतुमाधवराव, संपादक, मोगल दरबाराची बातमीपत्रे, खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८, पृ. १२७

६) भारत इतिहास व संस्कृती, त्रैमासिक, एप्रिल ते जून १९९४, खानदेशाच्या इतिहासाची दिशा, मुंबई मराठी ग्रंथालय, मुंबई, पृ. ४१

७) वाड, ग. चि., संपादक, पेशवा डायरी, खंड ३,

पेशवा बाळाजी बाजीराव, भाग १, द डेक्कन व्हॅर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०७, पृ. ४७, ४८

८) भारत इतिहास व संस्कृती, त्रैमासिक, एप्रिल ते जून १९९४, खानदेशाच्या इतिहासाची दिशा, मुंबई मराठी ग्रंथालय, मुंबई, पृ. ४१

९) पोतदार, द. वा., चंद्रचूड दफ्तर, गंगोबा तात्यांची कारकीर्द, भारत इतिहास संशोधक मंडळ,पुणे, १९२०, पृ. ७५

१०) तैत्रव, पृ. १७४

११) राजवाडे, वि. का., संपा. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, पत्रांक १०५, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, पृ. १८७८

12) General No. 18, Volume no.170, Date 13 April 1818, Deccan Commissioner Records, Pune Archives,

13) General No.175 , Volume no.239, Date 8 May 1818, Deccan Commissioner Records, Pune Archives,

14) General No. 64, Volume no.170, Date 26 May 1818, Deccan Commissioner Records, Pune Archives,

15) General No. 472, Volume no.443, Date 22 June 1818, Deccan Commissioner Records, Pune Archives,

16) General No. 149, Volume no.171, Date 29 July 1818, Deccan Commissioner Records, Pune Archives,

17) General No. 305, Volume no.173, Date 2 December 1818, Deccan Commissioner Records, Pune Archives,

18) General No.334, Volume no.174, Date 2o December 1818, Deccan Commissioner Records, Pune Archives,

19) General No. 441, Volume no.175, Date 10 March 1819, Deccan Commissioner Records, Pune Archives,

20) General No. 495, Volume no.131, Date 10 July 1819, Deccan Commissioner Records, Pune Archives,

ЖЖЖ

**21**

# जीवन समाधान और आशावादी – निराशावादी अभिवृत्ती

**प्रा.डॉ. व्ही एन रामटेके**
मानसशास्त्र विभाग प्रमुख,
सरदार वल्लभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर

## प्रस्तावना

घर के माता–पिताकी ओर से, स्कूल, महाविद्यालय के अध्यापक के ओर से, अपने पडोस के परिसर के लोग, मित्रपरिवार और अपने जीवन मे आने वाले अनुभव इत्यादी के पार्श्वभूमी पर व्यक्ति को अभिवृत्ती उसके विचार– मूल्य बन जाते है सुखद परिवार के वातावरण का स्नेह, सुरक्षितता की स्वीकृती इन सभी के कारण सकारात्मक अभिवृत्ती बन जाती है तो रूढी परंपरा जपणे वाले परिवार के अस्वीकृत बच्चो मे नकारात्मक अभिवृत्ती बन जाती है क्रेच और क्रचफिल्ड (crech & Crutchfield) इनका कहना है कि व्यक्तियों के सामाजिक व्यवहार का कारण उनकी अभिवृत्ती और विश्वास मे छुपा हुआ रहता है जो व्यक्ती प्रत्यक्षि करण, प्रेरणा और भावना इन सभी पर निर्धारित होते है फ्रीमन Freeman (१९६६) ने कहा है कि अभिवृत्ती यह व्यक्ती व्यवहार को दिशा निश्चित करता है रेमर्स, रुमेल और गेज (Remmers, Rummel & gage) इनका कहना है कि अभिवृत्ती यह ऐसी संवेदनात्मक प्रवृत्ती है कि जो सकारात्मक अथवा नकारात्मक स्वरूप मे व्यक्ति अथवा वस्तू के प्रती दि गई मानसिक प्रतिक्रिया होती है अभिवृत्ती समाज की व्यक्ती, वस्तू, व्यवसाय, संस्था, जाती, धर्म और समुदाय इन सभी से संबंधित होती है और उनका संबंध आचार विचार, स्वभाव, जीवनमूल्य, चालीरीती और आदर्श इनके साथ होता है